TION SOCIETY ... DEGLOOR ... Dist.Nanded

# CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| १ | आजच्या मराठवाड्यातील नाट्यचळवळी समोरील आव्हाने<br>**नितीन सूर्यकांत गरुड** | १-३ |
| २ | भटक्या-विमुक्त जाती-जमातीचे प्रश्न व राजकारण<br>**डॉ. सत्यपाल हरी कांबळे** | ४-७ |
| ३ | लोकशाहीसाठी संगनमत महत्वाचे की सुसंवाद?<br>**डॉ. आर. बी. शेजुळ** | ८-१३ |
| ४ | भारतीय संविधान आणि बौद्ध तत्वज्ञान<br>**खिल्लारे शंकर अर्जुन** | १४-१६ |
| ५ | स्त्री हिंसाचार आणि कायदे<br>**डॉ. राजेंद्र फकिरराव बगाटे** | १७-२३ |
| ६ | राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि नैतिकतेचे राजकारण<br>**आशीष जयराम मुंडे** | २४-२७ |
| ७ | पारंपारिक लोकजीवनाचे प्रतिबिंब; लोकसाहित्य<br>**अरविंद ज. चक्रनारायण** | २८-२९ |
| ८ | बाबुराव बागुल यांच्या साहित्यातील क्रांतीकारकत्त्व<br>**गायकवाड बाळू भागवत** | ३०-३१ |
| ९ | जागतिकीकरणाचा स्थानिक वृत्तपत्रांवर झालेला परिणाम<br>**करुणा टाकळगांवकर** | ३२-३४ |
| १० | मराठी दलित कथेतील विद्रोहाचे स्वरूप<br>**प्रा. कांबळे दत्ता रामचंद्र** | ३५-३८ |
| ११ | भारतीय पर्यावरण संरक्षण आणि विकास<br>**प्रा. सतीश दांडगे**<br>**सहा. प्रा. देशमुख आर. के.** | ३९-४६ |
| १२ | पंचायतराज योजनेत महिलांचा सहभाग<br>प्रा. डॉ. पी. पी. गिरणीवाले | ४७-४९ |
| १३ | गावपांढरीतून पाझरणारा इतिहास<br>**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले** | ५०-५ |
| १ | नयी कहानी आंदोलन के सशक्त रचनाकार : कमलेश्वर<br>डॉ. सुकुमार भंडारे<br>अमोल जनार्दनराव थोर | १-२ |


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT ... DEGLOOR ... SOCIETY'S DEGLOOR

**१३**

# गावपांढरीतून पाझरणारा इतिहास

**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
प्रमुख, मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

ऐतिहासिकता व वास्तविकता यांचे प्रतिबिंब साहित्यातून उमटलेले असते. विशेषता ग्रामीण साहित्य वास्तवतेच्या अधिक पोहचते. खरे तर काल्पनिक आणि वास्तव यांचा अजोड सांधा जोडण्याचे कार्य साहित्यिक करतात. त्यामधूनच ग्रामीण साहित्यिकांनी लेखन सजवले - साकारले आहे. कथा - कादंबरी, कविता, नाटय व इतर वाङ्मय प्रकार हताळत असताना लेखनाच्या विविध प्रवाह प्र अव्हेरुन ते साहित्य अर्वतीर्ण झाले आहे. मूलतः कादंबरी हा वाङ्मय प्रकार निराळा आहे. कारण या वाङ्मय प्रकारावर, स्थळ - व परिस्थितीचे पडसाद गडदपणे उमटलेले असतात. मराठवाडयातील लेखकांनी हा वाङ्मय प्रकार हाताळताना उपरोक्त बाबी सहजपणे नों असल्याचे आढळते. मराठी कादंबरीमध्ये मराठवाडा प्रदेश रेखाटणारे दिग्गज लेखक आहेत. रा.रं.बोराडे, ना.धों.महानोर, वि.शं. पारगा गणेश आवटे, नागनाथ कोत्तापल्ले, शेषेराव मोहिते इ. बरेच कादंबरीकार या प्रभावळीत लेखन केलेले आहेत. त्याच्या रांगेत उल्लेख क असे उदयोन्मुख लेखक महेश मोरे हे 'गावपांढरी' या कादंबरीमुळे प्रसिध्दीस आलेले आहेत.

गावपांढरी या कादंबरीचे कथाबीज मराठवाडयातील निजाम राजवट आणि त्या प्रभावातून येथील समाजवास्तव कसे होते, हेच प्रस्तुत कादंबरी ३५२ पृष्ठसंख्येची आहे. निजामी राजवटीचा विस्तृत असा कालपट चित्रित करणारी, त्या राजवटीच्या जुलूम अत्याच कहाणी कथन करणारी कादंबरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हा निजामाच्या अंकित प्रदेश, हुकूमशाही राजवटीतील प्रांत हैद्राब निजामाची राजधानीचे शहर. इंग्रजांच्या गुलामगिरीतून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला, परंतु मराठवाडयामध्ये स्वातंत्र पहाट उजाडण्यासाठी १ वर्ष १ महिना २ दिवस उशीर झाला. हा उशीर का झाला? आणि या संक्रमणकाळातील मराठवाडयातील जनजीवन होते? यांचा विस्तृतपणे आढावा घेणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीतील कथनकांचा कालखंड १९४७-१९४८ हाच आहे.

मराठवाडयामध्ये निजामसत्तेचे मांडलिकत्व स्वीकारुन सरंजामदारांची निर्मिती झाली. गावाचा कारभार त्याच वतनदाराम चालायचा. त्या प्रस्थापितांचे वास्तव्य गावाच्या मध्यभागी गढीवर असायचे. गढी म्हणजेच पांढरी, पांढरीचा वचक गावभर - शिवार असायचा. गाव - शिवारामध्ये प्रस्थापित वतनदारांचा हुकूम चालायचा. त्यामधून शेती कसणारे ते खेडयातील माणसे म्हणजे काळी जगणारे, काळया आईच्या पुण्याईन जीवनव्यवहार सांभाळणारे या आशयाने 'काळी' हा शब्दप्रयोग येतो. तसेच काळी आणि पांढरीतील असा ऋणानुबंध कृषिजीवनात पाहवयास मिळतो. 'राव करील ते गाव करील' असा सन्मान वतनदारांना प्रस्थापित समाजव्यवस्थेत हो त्या पांढरीवर वास्तव्य करणाऱ्यांना परंपरेना मान सन्मान दिला. ते निजामकाळात कशा प्रकारे सन्मानजनक होते, याची पडताळणी कादंबरीच्या माध्यमातून करता येऊ शकतो.

**गावपांढरीतील कथानक**

प्रस्तुत कादंबरीचे कथानक सप्त प्रकरणामध्ये विभागलेले आहे. या कादंबरीतील पहिल्या प्रकरणात किसान संघटना आणि सश लढा या शीर्षका अंतर्गत हैद्राबाद स्टेटच्या कार्यकर्त्यांनी ऑगस्ट, १९४७ पर्यंत निजामसत्तेशी कसा लढा दिला याबद्दलचे विवेचन आले अ मराठवाडयामध्ये सर्वत्र रझाकारांच्या विरुध्द रान पेटले होते. या निजामविरोधी लढयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, गंगाप्र

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR ADARSH EDUCATION SOCIETY'S Dist.Nanded

'हे हरामी रझाकार केंव्हाही येऊ शकतात. नावालाच राहा गावाला तयार ठेवा, तरण्या पोरांना ज्ञान द्या,'[१] असे संदेश दिले. गावाची घटना, एकता वाढविण्यासाठी लोकजागृती घडवून आणली. कादंबरीचा नायक 'तात्या' हा गावातील कर्ता पुरुष आहे. गावातील संघटन करुन रझाकारांच्या दैनंदिन घडामोडी गावापर्यंत पोहचवितो. त्याच्यामार्फत मराठवाडयातील स्थळनिहाय घडलेल्या घडामोडीचे लेखकांने नमूद केले आहेत. 'हैद्राबाद स्टेट काँग्रेस'च्या नेतृत्वात 'मराठवाडा मुक्तीसंग्रामा'चा लढा करण्यात आला. कासीम रझवीच्या आशावादाने निजाम स्वतंत्र भारतात सामील न होता स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे स्वप्न रंगवू लागला. तेंव्हा मुक्ती लढयाला अधिकच रपणा प्राप्त झाला. राजेशाही, बेजबाबदार शासन प्रणाली विरुध्द, सरंजामशाही विरुध्द हा मुक्ती लढा चालविला. कादंबरीच्या उत्तरार्धात लढयातील अखेरचे पर्व नोंदविले आहे. कासीम रझवी आणि इस्तेहादुल मुस्लीम यांनी असा प्रचार आरंभीला होता की, 'मुस्लीमेत्तर ने राज्य सोडून पळून जावे अन्यथा मृत्यूला तोंड द्यावे,'[२] यामुळे सशस्त्र क्रांतिकारी स्वातंत्र्य सैनिकांनी निकराने झुंज दिली. परभणी त तालुक्याच्या व खेडयागावामध्ये सशस्त्र लढयाचे केंद्र स्थापन केले होते. त्या केंद्रांतर्गत प्रशिक्षित सशस्त्र सैनिकामार्फत गावसरंक्षण झाकारांचा प्रतिकार करण्यात येत असे.

स्वातंत्र्योत्तर भारताचा आनंदोत्सव सर्वत्र साजरा होत असताना मराठवाडयातील माणसांची कुचंबना होताना दिसते. या संदर्भात सवांद महत्वाचा वाटतो, 'गावातील माणसं मंदिरावर किंवा वारकाच्या दारात गप्पा करायचे. 'अवो इंग्रज नं गेलेत की,' 'तसं नहाई भाऊ वरलाकडल काळंकुट्ट गर्दाबाद झालेलं आभाळ दिडसे वरपान गेलानिक, खाल्लाकडचं ढगाळ तसंच हाय नुसतं, आयलंय त दाटून हाय, आता खाल्लाकडं कोणता रावण हाय अजून आरबा !' 'त्या निजामाची टांगती तलवार हायंकी उरावर' 'असं व्हय.... हा गणपत आणि मुंजा सुतार या दोघांतील संवाद तत्कालीन समाजवास्तव अधोरेखित करते. निजामाचे गावागावातील रखवालदार आणि तात्यांचा संघर्ष कादंबरीमध्ये आलेला आहे. निजामविरोधी कारवाया लक्षात घेता रझाकारांनी रोहिल्यांना संतापाने आदेश दिला. ह ओ तात्या? कल सबेरे बीस आदमी लेके उसके गाँव जाँव. और सब लुटके लाव'[४] या आदेशाप्रमाणे कारवाई करण्यात आली. पण या पराक्रमी गावकऱ्यांपुढे एकही रोहिला टिकला नाही. परंतु रोहिल्यांनी मराठवाडयातील गावामध्ये लूट, खून, मारामाऱ्या, दरोडे तथा स्मितेच्या घटकांना उध्वस्त करण्याचा षडयंत्र चालविले. 'निकालो जल्दी, पैसा निकालो, सोना निकालो, हम इसके बिगर गाव नही ' गल्ली बोळातून रझाकारी लूट झाल्याचे प्रतिनिधिक वर्णन कादंबरीत सापडते. त्याच बरोबर लुटालूट करणाऱ्या रोहिल्यांचा प्रतिकार न संघटितपणे केला जात असे. 'धरा !धरा ! मारा! मारा!'असे गावामध्ये रझाकार घुसताच नारे घुमू लागले. शेजारी गावचे लोक नयी धावून येऊ लागले. यामध्ये रझाकारांनी काही ठिकाणी कत्तलपण केली. कित्येक माणसे गतप्राण झाली. निजाम सरकार विरोधी मराठवाडा लढत होता. बहाद्दर पराक्रमी माणसं धाडसीपणे एकत्र येऊन रोहिल्यांचा प्रतिकार करीत होते. 'पेरणी तर करुच तात्या , झाकाराला कडबा तोडल्यावणी तोडून काढूत'[६] या संदर्भात निसर्गबदलानुसार हंगामी कामे करत असताना रझाकार ओरडत होता, के खिलाफ जाता है, साले के हात - पैर तोड देंगे, खत्म कर देंगे.' यास तात्याने डरकाळी फोडून दिलेले उत्तर मार्मिक आहे. दम हाय तर भडव्या झोपेत गोटे घलायलास, गावच्या गाव लुटायलास, हाणामारा तुटून पडा या लुटारुवर.'[७]

भयग्रस्त मराठवाडा, निजामाच्या रझाकाराकडून गावामध्ये घातलेला धुमाकूळ , सर्व अठरापगड जातीच्या लोकांनी मुलाबाळांचे, , कुटूंबाचे गावाचे संरक्षण करण्यासाठी दिलेली झूंज आजही मनोवेधक वाटते. जिव्हारी लागणाऱ्या घटना चिरंतन परिणाम करणाऱ्या तात्या सारख्या प्रतिनिधिक व्यक्ती लढता - लढता बारा महिने निसर्गचक्रातील संकटाचा सामना करीत दुःख झेलत जीवन जगले. समरात योगदान दिले. आणि त्याचे फलित म्हणून १७ सप्टेबर, १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जाचातून मुक्त झाला.निजाम, रोहिले पळून गेले तेंव्हा तात्याच्या भाषणातील उद्‌गार बोलके वाटतात. 'मराठवाडयातील थोरा मोठया पासून ते शेतकरी , शेतमजूर, न, गोरगरीब, सम्ध्यांनी रात-दिस हा लढा दिल्यान आपण स्वतंत्र झालो.'[८]

DEGLOOR COLLEGE DEGLOOR ADARSH VIDYA ... EDUCATION SOCIETY'S Dist.Nanded



तेंव्हापासून ते आजतागायत मराठवाडयातील माणसे परंपरागत जगणे अव्हेरुन नवदिशा चोखंदळण्यासाठी प्रयत्नशील आहे निसर्गदत्त कामे करताना प्रामुख्याने शेतीबाह्य आधारित जीवन जगणारा सरंजामदार वतनदारांचा हा मुलूख आजही तेवढयाच जोमाने ताकदे एकसंघतेने वाटचाल करीत आहे. असे सूचक संदर्भ कांदबरीच्या उत्तरार्धातून आलेले आहेत.

'गावपांढरी' तील लोकजीवनामधील लोकगीतामधून आलेले ऐतिहासिक संदर्भ लेखकाने नोंदविले आहेत ते खालीलप्रमाणे. जात्यावरील ओव्यामध्ये महिला असे म्हणतात की,

'निजामाच्या तरासानं गाव सोडावं लागलं

लेकरांच्या पोटी आगं, भाकरीला भिडवलकिंवा

भरलेल घरदार, निजामानं, गिळलेलं,

भिकारी जगणं मन आत झटलेल.'[९]अशा निजाम सत्तेचा धिक्कार करणाऱ्या रचना ओवीगीतात आढळतात. गावपांढरीत भाषिकपैलू परिसराची ओळख दर्शवितात. शब्दकळा, शब्दप्रवृत्ती, म्हणी वाक्यप्रचार यांचा लेखकांनी संयुक्तिक वापर केला आहे. कनि जायदात, खमीस, गुमान हे निजामशाहीच्या प्रभावातील गामीण भागातील शब्द अवशेष लक्षवेधी आहेत. 'कळना न वळना, घोडया - घो हराळी खाय, जित्याची खोड ...., सुंभ जळलं पण ....' यासारख्या म्हणी सुभाषिते प्रस्तुत कादंबरीमध्ये या परिसरातील भाषेची साक्ष देत कादंबरीतील उर्दू - हिंदी संवाद हा वाचकांची निजामसत्तेच्या काळातील ऐतिहासिक स्मृती जागृत करणारे आहेत. मराठवाडा या वि प्रदेशातील माणसांची अंतरिक स्पंदने आणि स्वातंत्र्याची आस ठेवून स्वाभिमानाने संघर्षशील राहण्याची प्रवृत्ती अभ्यासकांचे लक्ष वेधून घे

मर्यादित कालावकाश घेऊन अवतीर्ण झालेली आणि वाङ्मयीन दृष्टया सरस ठरलेली ही एक कादंबरी आहे. ग्रामीण जीव वस्तुनिष्ठपणे विवेचन या कादंबरीत आलेले आहे. रझाकारांचा भयावहकाळ कथन करताना या प्रदेशाचे सत्व आणि तत्व अबा ठेवण्यासाठी लेखकाने समतोल ठेवला आहे. त्यामुळेच 'गावपांढरी' या कादंबरीस अल्पावधित लोकप्रियता मिळालेली आहे.

सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, भाषिक दस्ताऐवज म्हणून या कादंबरीचे मोल आहे, असे अधोरेखित करणे योग्य वाटते. प्र कादंबरी आगामी काळात युवापिढीला आपल्या मातीतील शूर वीर धैर्यशाली परंपरा ज्ञात होणे आणि तोच वारसा पुढे चालविण्या स्फूर्तीदायी ठरणारी वाटते.

## संदर्भ सूची

१) महेश मोरे - गाव पांढरी , (जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद. प्र.आ. २०१० पृ. )

२) कित्ता - पृ.

३) कित्ता - पृ.

४) कित्ता -पृ.११२

५) कित्ता - पृ.११६

६) कित्ता - पृ १८३

७) कित्ता - पृ. १८५

८) कित्ता -पृ २८७

९) कित्ता - पृ ३२७

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded